# विश्वामित्र

**ज्यानं परमेश्वराच्या अस्तित्वालाच आव्हान देण्याचं धाडस दाखवलं, असा एक माणूस...**

**डॉ. विनीत अगरवाल**

अनुवाद
**मनीषा सोमण**

**रिया पब्लिकेशन्स्**

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर - ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

Vishwamitra : Dr. Vineet Aggarwal
Marathi translation by Manisha Soman
First published in English by Penguin Metro Reads - Penguin Books India 2014
Copyright © Dr. Vineet Aggarwal 2014
First published in Marathi by Riya Publications in arrangement with Penguin Books India.

**विश्वामित्र :** डॉ. विनीत अगरवाल

अनुवाद : मनीषा सोमण

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर - ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**अनुवाद**
मनीषा सोमण
१५/४, कांचन गौरी, पंडित दीनदयाल रोड,
विष्णूनगर, सम्राट हॉटेलजवळ डोंबिवली (वेस्ट) ४२१२०२
मो. नं. : ९८२१२११२९७

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ २९०/-

ही कलाकृती मी अर्पण करतो आहे, माझ्या आजी-आजोबांना, ज्यांनी माझी पुराणकथांशी पहिली ओळख करून दिली... माझ्या वडिलांना, जे माझ्यासाठी सत्य आणि दयाळूपणाचे मूर्तिमंत आदर्श होते...

माझी आई, जिनं माझ्या आयुष्याला आशेचे किरण दाखवले,

आणि

माझी बहीण, जिनं मला लेखणीची ताकद समजावून दिली...

डॉ. विनीत अगरवाल हे पेशानं डॉक्टर असणारं, व्यवसायानं व्यवस्थापक असणारं आणि मनानं कलाकार असणारं व्यक्तिमत्त्व. त्यांचा जन्म झाला डॉक्टर कुटुंबात, शिक्षण पूर्ण झाल्यानंतरचा काही काळ त्यांनी कुटुंबाच्या वैद्यक व्यवसायातच घालवला. त्यात ते यशस्वीही झाले, परंतु त्या यशस्वी कारकीर्दीनंतर त्यांनी उडी घ्यायची ठरवली ती औषधनिर्मितीच्या उद्योगात आणि तीही त्यातल्या व्यवस्थापनाच्या दालनात. ते सुरू असतानाच आवड म्हणून ते लेखनाकडे वळले आणि व्यवसायानिमित्तानं प्रवास करीत असतानाच त्यांचा छायाचित्रणाचा छंदही वाढीस लागला.

डॉ. अगरवालांची साहित्यिक मुशाफिरी राजकारणापासून काव्यापर्यंत आणि प्रवासवर्णनापासून ते दहशतवादाची चिकित्सा करण्यापर्यंत बहरत गेली. परंतु त्यांचं मन रमलं ते विज्ञान आणि पुराणांची सांगड घालत लेखन करण्यात. डिकोड हिंदू मायथॉलॉजी या विषयावरचे त्यांचे ब्लॉग सुपरिचित आहेतच, परंतु फ्रॅटर्निटी अगेन्स्ट टेररिझम अँड एक्स्ट्रीमिझम या विषयावरचे त्यांचे ब्लॉग्जही वाचकांकडून गौरवले गेले. विश्वामित्र हे त्यांचं पहिलंच पुस्तक...

# लेखकाचं मनोगत...
# एक जगन्मित्र...

कुणाही लेखकाच्या गाठी त्याच्या पहिल्या पुस्तकाची किंमत काही औरच असते. आपल्या स्वत:च्याच लेखनक्षमतांचा वेध घेण्याचा प्रयत्न तो त्यातून करत असतो. एखादी नवी कलाकृती घडवण्यासाठी ज्या परिश्रमानं, जेवढं घाम गाळून, त्यात जीव ओतून त्याला काम करावं लागतं, तो सगळाच अनुभव त्याच्यासाठी खूप काही शिकवून जाणारा असतो. माझ्यासाठी हे पुस्तक हाही एक असाच अनुभव-ठेवा आहे. माझ्या लेखनप्रेमाची साक्ष पटवून देणारा, त्यासाठी मी गाळलेल्या घामाचं नेमकं मोल ठरवणारा.

विश्वामित्र ही काही धार्मिक कथा नव्हे, ती एखादी आध्यात्मिक साहित्यकृतीही नव्हे. हे कथानक संपूर्णपणे काल्पनिकही नव्हे आणि तितकंच ते वास्तवाधारितही नव्हे. परंतु तसं असलं तरीही त्याचं म्हणून एक म्हणणं आहे. त्याचा म्हणून एक संदेश आहे. खरं तर ही आहे एका सामान्य मानवाची कहाणी. हा माणूस असा की जो त्याच्या स्वत:च्या शारीरिक आणि बौद्धिक मर्यादांचं पुरेपूर भान ठेवतानाच त्याचं स्वत:चं भवितव्य घडवण्यासाठी झगडत राहिला, नशिबाशी दोन हात करीत राहिला. देवदास, गंधर्व, विद्याधर, सिद्ध, अरिहंत, बोधिसत्त्व यांच्यासारख्या आपल्या पुराणकथांमधल्या दिव्य पुरुषांसारखे दिव्य आपणही नसतो आणि हा कथानायकही तसा नाही. आपण सारी मानव- कुळातली सामान्य माणसं, आपल्या क्षमताही तशाच मर्यादित. परंतु तरीही आपण आपल्या भोवताली अशी असंख्य माणसं पाहतो की जी त्या मर्यादा उल्लंघिण्याचा प्रयत्न आपापल्या कार्यक्षेत्रात करीत राहतात. समाजानं आखून दिलेल्या लक्ष्मणरेषा ती ओलांडत राहतात, संकेतांना आव्हान देत राहतात आणि त्याच वेळेस उर्वरित मानवसमूहासाठी नवे मैलाचे दगड पेरीत राहतात. ही कथा अशा एका महामानवाला वाहिलेली प्रेरक-कथा आहे.

एखादी व्यक्ती वा एखादा माणूस तिचे वा त्याचे जीवनोद्देश पूर्ण करण्यासाठी कोणत्या दिव्यातून जाऊ धजतो याचं जिवंत आणि ज्वलंत उदाहरण म्हणजे विश्वामित्राची कथा. अनेक जण त्याला वैदिक काळातला एक महान ऋषी मानतात, तर अनेकांना त्याचं रामायणातलं कार्यच स्मरत राहतं. परंतु त्याला जाणणाऱ्या अनेकांना तो एक राजपुत्र म्हणून जन्मला हे ठाऊकच नसतं आणि त्याहीपुढे जाऊन त्याच्या अंगभूत कर्तव्याच्या आधारावर तो ब्रह्मर्षी बनला याचा तर पत्ताही नसतो. विश्वामित्र हा गायत्री मंत्राचा उद्गाता आहे, त्यानंच त्या मंत्राचा शोध लावलेला आहे, जगभर कोट्यवधी हिंदू ज्याचं दररोज पठण करतात, त्या मंत्राचा तो निर्मिक आहे हेही अनेकांना माहीत नसतं.

हे पुस्तक वाचत असताना, त्यात डोकावलेली व्यक्तिमत्त्वं जाणून घेत असताना, आपण यातल्या अनेकांना रोजच्या जीवनात कुठे ना कुठे भेटतो आहोत, भेटलो आहोत याचंच स्मरण प्रत्येकाला होत राहील. याचं मुख्य कारण असं की पहिला मानव आफ्रिकेच्या जंगलातून बाहेर पडल्यापासून, आजतागायत मानवी स्वभावात तसा काहीच फरक पडलेला नाही. त्याच्या सवयी, त्याचा स्वभाव यात फारसा फरक पडलेला नाही. पण असं असलं तरी हा कथानायक वेगळा आहे, चौकटीबाहेरचा विचार-आचार करणारा आहे हे आपल्याला ठायीठायी जाणवत राहील. तो प्रस्थापित धार्मिक प्रथा-परंपरांपलीकडचा विचार करणारा आहे, तो स्वत:च्या स्वतंत्र नजरेतून जगाकडे पाहणारा आहे, हेही आपल्या लक्षात येत राहील.

विश्वामित्राचा जन्म झाला तो एका क्षत्रिय घराण्यात. परंतु त्याच्या व्यक्तिमत्त्वातील दिव्यत्वाच्या आसेने आणि व्यक्तिश: त्याच्यावरच्या आध्यात्मिकतेच्या पगड्याने, त्याची महानातला महान ऋषी बनण्याची आकांक्षा दिवसेंदिवस वृद्धिंगतच होत गेली. ब्रह्मर्षीपदाला पोहोचलेला एकमेव क्षत्रिय राजा अशी त्याची दखल कालपुरुषाने घेतलीच, परंतु ग्रह-ताऱ्यांच्या विश्वाला जन्म देणारा एकमेव मानवी निर्मिक अशी त्याची नोंदही घेतली.

विश्वामित्राची कथा ही काही मानवी मानसशास्त्राच्या किंवा अध्यात्मशास्त्राच्या अभ्यासापुरती मर्यादित नाही. ती विज्ञानविश्वाला जशी अनेकदा गवसणी घालते, तशीच ती संपूर्ण विश्वातील जीवसृष्टीत आढळणाऱ्या कुणाही घटकाच्या बुद्धिमानतेत सापडणाऱ्या स्वभाववैशिष्ट्यांचंही दर्शन घडवते. तुम्ही

त्यावर विश्वास ठेवा वा ठेवू नका, परंतु ध्येयाप्रति असणारी त्याची जीवननिष्ठा आणि ते ध्येय गाठण्यासाठीची त्याची निष्णात कार्यशैली, त्याची कार्यपद्धती पाहिल्यानंतर तुमचा त्यावर विश्वास बसला नाही असं घडणंच शक्य होणार नाही.

कर्तव्ये आणि अपेक्षा यांच्या परिपूर्तीत दुभंगल्या गेलेल्या मानवी जीवाला त्यांची परिपूर्ती करताना कराव्या लागणाऱ्या संघर्षाची, त्यातल्या यशापयशाने मानवी मनाला होणाऱ्या वेदनांची कहाणी आहे हे पुस्तक. त्यात दडली आहे एका जबरदस्त अशा इच्छाशक्तीची कहाणी. ती इच्छाशक्तीही इतकी तीव्र की, तीही मन:पूत वागणाऱ्या नशिबाला ठायीठायी आव्हान देत राहते. ती इच्छाशक्ती कसली, तर ती एखाद्या राजाने आपल्या सर्वस्वाचा त्याग करावा आणि नि:संग बनावं अशी अपेक्षा बाळगणारी. ती इच्छाशक्तीही अशी की आपल्या मरणानंतरही मानवानं आपलं कायमचं स्मरण ठेवावं असं दिव्य कार्य आपल्या हातून याच जन्मी पार पडावं अशी.

त्यामुळेच ही कहाणी आहे आर्यावर्तातल्या एका अशा धीरोदात्त राजाची, ज्यानं युद्धभूमी तर विजय- मोहिमांनी गाजवलीच, परंतु ज्यानं आपल्या आध्यात्मिक शक्तीच्या बळावर कालत्रयीलाही ललामभूत वाटेल असं ऋषित्व प्राप्त केलं. ही कहाणी आहे एका अशा पौरुषत्वाची, ज्यानं देवाधिदेवांनाही आव्हान देण्याचं नैतिक बळ प्राप्त केलं. ती तुम्हाला आवडेल याविषयी माझ्या मनात यत्किंचितही शंका नाही.

✦✦✦